# गर्भ शस्त्रक्रिया आणि मूत्रसंस्थेसंबंधीत शस्त्रक्रियेच्या तीन दिवसीय परिषदेचे २०२४ (२०२४) आयोजन

मुंबई : गर्भाच्या शस्त्रक्रियेची मागणी ही चिंतेची बाब ठरत असून ५,००० पैकी अंदाजे ५ गर्भास याची आवश्यकता भासते. स्पाइना बिफिडा, मानेचा आकार मोठा असलेले बाळ, मूत्रमार्गात अडथळे (LUTO) आणि काही ट्यूमर यांसारख्या परिस्थिती गर्भाच्या विकासावर विपरित परिणाम करतात. भविष्यातील हानी टाळण्यासाठी वेळीच उपचार करणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस या प्रकरणांची वाढती संख्या पाहता मुंबईतील लीलावती हॉस्पिटल, स्पायना बिफिडा फाउंडेशन आणि पोलंडच्या द मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसियाच्या संयुक्त विद्यमाने गर्भाच्या शस्त्रक्रिया (फिटल सर्जरी) विभागाचे उद्घाटन केले आहे, ज्याचे उद्दिष्ट गर्भातील जन्मजात दोष आणि गर्भाच्या आरोग्याची स्थिती सुधारणे हे आहे. २२, २३ आणि २४ मार्च २०२४ रोजी गर्भ शस्त्रक्रिया आणि मूत्रसंस्थेसंबंधीत शस्त्रक्रियेच्या तीन दिवसीय परिषदेचे 2024 (FSUI2024)आयोजित करण्यात आले आहे. भारतात भ्रूण शस्त्रक्रियेच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी नरीमन पॉइंट येथील ट्रायडंट हॉटेल येथे ही ३ दिवसीय भ्रूण शस्त्रक्रिया आणि मूत्रसंसर्ग शस्त्रक्रिया परिषद ( २०२४) आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत जगभरातील नामांकीत तज्ज्ञ, अभ्यासक आणि संशोधक भारतातील गर्भ शस्त्रक्रिया आणि त्याच्या विकासाच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी एकत्र येणार आहे. मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. संतोष करमरकर(एफएसयुआय परिषद २०२४ चे अध्यक्ष आणि लीलावती रुग्णालयातील बालरोग शल्यचिकित्सक), पोलंडमधील गर्भ शल्यचिकित्सक डॉ. एग्निएस्का पास्तुस्का आणि एफओजीएसआय चे अध्यक्ष डॉ. तांदुळवाडकर यांचा समावेश आहे.या परिषदेचे उद्घाटन श्री प्रशांत मेहता (विश्वस्त-लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्ट) यांच्या हस्ते होणार आहे. गर्भाच्या शस्त्रक्रियेमध्ये गर्भधारणेदरम्यान गर्भावर शस्त्रक्रिया केली जाते ज्याचा उद्देश जन्मजात दोष असलेल्या मुलांना योग्य उपचार मिळावे जेणेकरुन त्यांना जन्मानंतरच्या गुंतागुत टाळता येऊ शकते. वेळीच उपचार न झाल्यास भविष्यात आरोग्यासंबंधी गुंतागुंत, अपंगत्व किंवा मृत्यू ओढावू शकतो. स्पायना बिफिडा आणि गर्भाच्या मूत्रमार्गातील अडथळे यांसारख्या परिस्थितीत गर्भाची शस्त्रक्रिया करुन विकसनशील अवयवांना नुकसान होण्याचा धोका कमी करते, ज्यामुळे अर्भकांसाठी भविष्यात चांगले आयुष्य मिळते. गर्भाच्या शस्त्रक्रियेच्या महत्त्वावर बोलताना डॉ. संतोष करमरकर( वरिष्ठ सल्लागार, बालरोग शल्यचिकित्सक, लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, मुंबई) सांगतात की, गर्भाची शस्त्रक्रिया ही प्रसूतीपूर्व आरोग्य सेवेमध्ये लक्षणीय प्रगती दर्शवते, ज्यामुळे गर्भासंबंधीत दीर्घकालीन गुंतागुंत टाळण्यासाठी

